Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178, 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स..नं.८३२ए, फायनल प्लॉट नं.१७८, १७९बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750&EPABX -25705000& Email : secretary.stateboard@gmail.com

तातडीचे
ईमेलद्वारे

क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती२३-२४/1305
पुणे ४११ ००४.
दिनांक – २६ मार्च २०२४

प्रति,
विभागीय सचिव
सर्व विभागीय मंडळे.

विषय – सन २०२३-२४ मधील राज्यातील दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांची (इ.१०वी व इ.१२वी) परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेसाठी Online द्वारे माहिती सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ –
१. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.३१/१०/२०२३
२. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.१०/११/२०२३
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.१०/११/२०२३
४. शा. शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क.र.४७/एसडी-५, दि.१ ऑगस्ट, २०१९
५. शा.नि.क्र.एफईडी १५९२/१००२/(११३२)/साशि-५, दि.०३/०२/२०२०
६. क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/२३-२४/११३१, पुणे ४ दि.१८/१०/१९९३
७. अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ, महाराष्ट्र यांचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शासनाचे संदर्भीय क्र.१व २ च्या शासन निर्णयानुसार, टंचाईग्रस्त / दुष्काळग्रस्त भागातील इ.१०वी व इ.१२वी च्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती ही राज्यमंडळ स्तरावरुन करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य ४० तालुके व याव्यतिरिक्त १०२१ महसूल विभागातील बाधित क्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४' मधील परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी इ.१०वीसाठी 'http://feerefund.mh-ssc.ac.in' आणि इ.१२वीसाठी 'http://feerefund.mh-hsc.ac.in' ह्या लिंकवर उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर लिंकवर दि.२६ मार्च, २०२४ पर्यंत माहिती सादर करण्याची मुदत देण्यात आली होती, तथापि, सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालये हे दि.२६ रोजी मुदत संपुष्टात येत असल्याने एकाच वेळी login करण्याचा प्रयत्न करीत आहेत, सबब संगणक प्रणालीवर ताण येत असून माहिती सादर करण्यामध्ये तांत्रिक अडचणी येत आहेत. सबब, online द्वारे माहिती सादर करण्यासाठी दि.२८ मार्च, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

मुदतवाढीच्या अनुषंगाने आपल्या विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना दि. २८ मार्च, २०२४ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने माहिती भरणेबाबत अंतिम मुदतवाढ देण्यात येत असल्याचे सूचित करण्यात यावे. तसेच आपण वैयक्तिक लक्ष घालून विहित कालावधीमध्ये माहिती राज्यमंडळाकडे सादर करणेबाबत संबंधितांचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी –
१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
३. मा.शिक्षण संचालक (योजना), मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
४. विभागीय शिक्षण उपसंचालक - पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर / अमरावती / नाशिक / लातूर / कोल्हापूर / बृहन्मुंबई –
५. शिक्षणाधिकारी(माध्यमिक)- यांना कळविण्यात येते की, बाधित क्षेत्रातील पात्र विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन पध्दतीने राज्यमंडळास विहित वेळेमध्ये सादर होण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करावा.
६. श्रीमती योगिता देशमुख, कक्ष अधिकारी (SD-5), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२